**सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – दिनकर बाबुराव मुळे,

वय – ७० वर्षे, व्यवसाय–शेती,

राहणार – रा. हणमंतवाडी, ता.निलंगा, जि. लातूर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए.एन. अन्सारवाडेकर यांचे मार्फत सुरुः–**

१. आरोपींना मी ओळखतो. तो माझ्या गावातील आहे. फिर्यादी रेश्मा हिला मी ओळखत नाही. रेश्मा आणि गहीनीनाथ यांचे लग्न केव्हा झाले होते हे मला माहीत नाही. त्यांच्यामध्ये काय घडले होते हे मला माहीत नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली**.** वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०.१२.२०१५ रोजी मोजे हणमंवाडी येथे रेश्मा आणि गहीनीनाथ यांचे लग्न झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी तिला लग्नानंतर काही दिवस व्यवस्थित नांदवले. हे म्हणणे खरे नाही की, तिच्या चारीत्र्यावर संशय घेऊन, ति कामधंदा करत नाही म्हणुन तिचा छळ केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मोटारसायकल घेण्याकरीता तिच्याकडे पैशाची मागणी आणि एक तोळा अंगठीची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या करीता तिला आरोपींनी घरातून हाकलून दिले होते. (आता मला दि.१८.०१.२०१८ रोजीच्या जबाबातील आधोरेखांकीत भाग अ वाचून दाखवण्यात आला.) हे म्हणणे खरे नाही की, तो अधोरेखांकीत भाग मी पोलीसांना सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**निशाणी क्र. ६४**

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. एच.व्ही. गायकवाड यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.01.30 17:52:16 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–३०/०१/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,

निलंगा